महाराष्ट्र शासन

**राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई**

**(उच्च व तंत्र शिक्षण विभाग )**

हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस् समोर, फोर्ट, मुंबई-४०० ००१

दुरध्वनी क्र. ०२२ २२०७०९४२, संकेतस्थळ:www.siac.org.in, ई-मेल:siac१९१५@gmail.com

जाहिरात क्रमांक: ०४/विशेष शिष्यवृत्ती योजना/२०२२-२३/ दिनांक :२१/०३/२०२२

# जाहिरात

**केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत निवड होणाऱ्या अखिल भारतीय प्रशासकीय सेवांमध्ये महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांचे प्रमाण वाढावे यासाठी गुणवत्ताधारीत विशेष शिष्यवृत्ती योजना**

केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखत फेरीपर्यंत पोहोचणाऱ्या तथापि, अंतिमत: भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये निवड न होणाऱ्या राज्यातील होतकरु व गुणवान उमेदवारांना दिल्ली येथील केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची पूर्व तयारी करुन घेणाऱ्या नामांकित खाजगी प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण घेण्यासाठी सदर योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीच्या माध्यमातून वर्ष २०१६ पासून विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येते.

सदर शिष्यवृत्तींसाठी उमेदवारांनी खालील निकषांची पुर्तता करणे आवश्यक राहील.

१. सदर उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असावा.
२. अर्जकर्त्या उमेदवाराचे व त्याच्या कुटूंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न रु. १०.०० लाखाच्या मर्यादेत असावे.
३. मागील तीन वर्षामध्ये म्हणजे सन- २०१८, २०१९ व २०२० या वर्षांमध्ये किमान एक वेळा केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखत फेरीपर्यंत पोहोचणाऱ्या तथापि अंतिमत: भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये निवड न झालेला उमेदवार सदर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करु शकेल.
४. उमेदवाराने अर्जासह पदवी परीक्षा प्रमाणपत्र, रहिवासी दाखला (Domicile of Maharashtra Certificate) त्या वर्षाच्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेचे प्रवेशपत्र (Hall Ticket) व गुणपत्रिका इ. कागदपत्रे सादर करावीत.
५. उमेदवारास भाग-१ भाग-२ व भाग-३ या योजनेचा भागनिहाय लाभ एकदाच अनुज्ञेय राहिल.
६. शिष्यवृत्तीसाठी पात्र उमेदवारास प्रशिक्षण घेतल्यानंतर केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा परीक्षा देणे बंधनकारक आहे, अन्यथा शिष्यवृत्तीची रक्कम एक रकमी शासनास परत करण्यात येईल अशा आशयाचे बंधपत्र रु. १०० च्या स्टॅम्प पेपर वर देणे बंधनकारक असेल.

७. सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेणाऱ्या प्रत्येक उमेदवारास दिल्ली येथील त्याच्या प्रशिक्षणाच्या वास्तवाच्या कालावधीसाठी रु. १०,०००/- प्रति माहे प्रमाणे निर्वाह भत्ता उपस्थितीनुसार देण्यात येईल.

८. उमेदवाराने प्रशिक्षण संस्थेमार्फत मासिक उपस्थिती अहवाल राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई संस्थेस सादर करणे बंधनकारक राहील.

९. सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेणारा उमेदवार पूर्व परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास त्याची शिष्यवृत्ती समाप्त करण्यात येईल.

१०. शासन पत्र क्रमांक - स्कॉलर-४९१६/प्र.क्र.२८२/ मशि-२ दिनांक ११ मार्च २०२२ प्रमाणे शिष्यवृत्ती योजनेकरीता खालील तीन संस्थांची निवड करण्यात आली आहे.

- **प्रशिक्षणासाठी निवड केलेल्या प्रशिक्षण संस्थाबाबत माहिती :**

| अनु. क्र | प्रशिक्षणासाठी निवड केलेल्या दिल्ली स्थित संस्थेचे नांव |
|---|---|
| १. | **Vajiram & Ravi, New Delhi** |
| | **General Studies (Prelim & Main Integrated Course)**<br>**CSAT**<br>**Optional Subjects**-<br>Commerce & Accountancy<br>Public Administration<br>Geography<br>Economics<br>Mathematics<br>Political Science &I.R.<br>Anthropology<br>History<br>Philosophy<br>Sociology<br>Psychology |
| २. | **Vision IAS, New Delhi** |
| | Classes for G.S. Prelims, CSAT, GS Mains, Essay Current Affairs<br>Test Series for G.S. Prelims, CSAT, GS Mains, Essay<br>Study Material for GS Prelims and Mains, Essay, Monthly Current Affairs<br>Magazines<br>Personalized Mentoring Program<br>Interview Program. |
| ३. | **Ramaswamy IAS Academy** |
| | Preliminary Examination<br>Main Examination<br>Personality Test and Mock Interview |

**महत्वाची सूचना :**

- उमेदवारानी वरील तीन संस्थापैकी एक संस्था निवडायची आहे.
- Vajiram & Ravi व Vision IAS संस्थेत प्रशिक्षणापोटी भरावयाचे शुल्क सुरवातीस उमेदावारास भरावे लागेल. त्यानंतर शासनाकडून उमेदवारास शुल्काची रक्कम परत करण्यात येईल.
- Ramaswamy IAS Academy या संस्थेचे प्रशिक्षण शुल्क स्वत: उमेदवाराने न भरता प्रशिक्षण संस्थेस शासनाद्वारे अदा करण्यात येईल.

**ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचा कालावधी :**

| दिनांक पासून | दिनांक पर्यंत |
|---|---|
| दि. २१.०३.२०२२ | दि. ३१.०३.२०२२ |

- उमेदवारानी www.siac.org.in या संकेस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज खाली दिलेल्या लिंकद्वारे सादर करावेत.

  https://forms.gle/२२५EuwQkRH१Go८R२७

- शासन निर्देशानुसार योजनेत वेळोवेळी बदल करण्याचे सर्व अधिकार कार्यकारी समितीकडे राखीव असतील.

**टिप:** संस्थेच्या संकेतस्थळावर दिनांक १६.०४.२०१६ चा शासन निर्णय व बंधपत्र नमुना देण्यात आलेला आहे.

सही/-

( डॉ. खुशपत सु. जैन )
संचालक,
राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई
तथा समन्वय अधिकारी

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत निवड होणाऱ्या अखिल भारतीय प्रशासकीय सेवांमध्ये महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांचे प्रमाण वाढावे यासाठी गुणवत्ताधारीत विशेष शिष्यवृत्ती योजना.

## महाराष्ट्र शासन
## उच्च व तंत्र शिक्षण विभाग
## शासन निर्णय क्रमांकः प्रीआय-५४१५/प्र.क्र.१९२/मशि-२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: १६ एप्रिल,२०१६.

**प्रस्तावना :-**

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत निवड होणाऱ्या भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांचे प्रमाण वाढावे याकरिता महाराष्ट्र शासनाकडून राज्यात मुंबई, नागपूर, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती व नाशिक या ६ ठिकाणी भारतीय प्रशासकीय सेवा परीक्षा पूर्व प्रशिक्षण केंद्रे सुरु करण्यात आलेली आहेत. या संस्थांमधून प्रत्येक वर्षी साधारणत: ६०० उमेदवारांना विद्यावेतन, मार्गदर्शन वर्ग, वसतिगृह, ग्रंथालय, इंटरनेट सुविधा, व्यायामशाळा इत्यादी सोयी नि:शुल्क पुरविल्या जातात.

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत निवड होणाऱ्या अखिल भारतीय सेवांमध्ये महाराष्ट्रातील अधिकाऱ्यांचे प्रमाण वाढावे याकरिता केंद्रीय लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या महाराष्ट्रातील उमेदवारांना मुख्य परीक्षा व मुलाखत पूर्व प्रशिक्षणाकरिता अर्थसहाय्य देण्याबाबतची घोषणा मा. वित्त मंत्री यांनी सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पिय भाषणामध्ये केली होती. तथापि, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेला बसणारे उमेदवार अनुज्ञेय सर्व संधींचा लाभ अंतिमत: यशस्वी होईपर्यंत घेत असतात. शिष्यवृत्ती योजनेचा लाभ अधिकाधिक उमेदवारांना त्यांच्या सोयीनुसार घेणे शक्य व्हावे यादृष्टीने अशी योजना लवचिक असणे आवश्यक असल्याने, केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखत फेरीपर्यंत पोहोचणाऱ्या तथापि, अंतिमत: भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये निवड न होणाऱ्या राज्यातील होतकरु व गुणवान उमेदवारांना दिल्ली येथील केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची पूर्व तयारी करुन घेणाऱ्या नामांकित खाजगी प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्तीच्या माध्यमातून अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखत फेरीपर्यंत पोहोचणाऱ्या तथापि, अंतिमत: भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये निवड न होणाऱ्या राज्यातील होतकरु व गुणवान उमेदवारांना दिल्ली येथील केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची पूर्व तयारी करुन घेणाऱ्या नामांकित खाजगी प्रशिक्षण संस्थांमध्ये प्रशिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्तीच्या माध्यमातून अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यासाठी खालीलप्रमाणे भाग-१, भाग-२ व भाग-३ या स्तरांवर शिष्यवृत्ती योजना सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे:-

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या वेळापत्रकानुसार अंतिम निवड यादी प्रसिध्द झाल्यानंतर पुढील वर्षीच्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या पूर्व, मुख्य व मुलाखत परीक्षेकरिता सदरची गुणवत्ताधारीत शिष्यवृत्ती योजना भाग-१, भाग-२ व भाग-३ या स्तरांवर राबविण्यात येईल.

सदर शिष्यवृत्तींसाठी उमेदवारांनी खालील निकषांची पुर्तता करणे आवश्यक राहील:-

(१) सदर उमेदवार महाराष्ट्राचा रहिवासी असावा.

(२) अर्जकर्त्या उमेदवाराचे व त्याच्या कुटुंबाचे एकूण वार्षिक उत्पन्न रु.१०.०० लाखाच्या मर्यादेत असावे.

(३) मागील तीन वर्षामध्ये किमान एक वेळा केंद्रीय लोकसेवा आयोगाची मुख्य परीक्षा उत्तीर्ण होऊन मुलाखत फेरीपर्यंत पोहोचणाऱ्या तथापि, अंतिमत: भारतीय प्रशासकीय सेवेमध्ये निवड न झालेला उमेदवार सदर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करु शकेल.

(४) उमेदवाराने अर्जासह पदवी परीक्षा प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, त्या वर्षीच्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची गुणपत्रिका इ. कागदपत्रे सादर करावीत.

(५) उमेदवारास भाग-१, भाग-२ व भाग-३ या योजनेचा भागनिहाय लाभ एकदाच अनुज्ञेय राहील.

उपरोक्त निकषांची पुर्तता करणारे उमेदवार खालीलप्रमाणे भाग-१, भाग-२ व भाग-३ या शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यास पात्र राहतील :-

<u>भाग-१ :-</u>

(१) केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेस बसणाऱ्या उमेदवारांना त्या वर्षीच्या मुलाखतीपर्यंतच्या कालावधीसाठी दिल्ली येथील निवडक प्रशिक्षण वर्गांमध्ये मुलाखतीपर्यंतच्या उपलब्ध असणाऱ्या कोर्सला प्रवेश घेण्यासाठी भाग-१ शिष्यवृत्ती देण्यात येईल.

(२) केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची अंतिम यादी प्रसिध्द झाल्यानंतर पुढील वर्षीच्या परीक्षेसाठी सदर शिष्यवृत्तीचा अर्ज राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई यांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. उपरोक्त निकष पूर्ण करणाऱ्या व विहित मुदतीमध्ये जाहिरातीला प्रतिसाद देणाऱ्या उमेदवारांना विहित अटींच्या अधीन राहून सदर शिष्यवृत्ती देण्यात येईल.

(३) शासनाने निवड केलेल्या दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थांकडून प्रवेशित उमेदवार व त्यांच्या प्रशिक्षणापोटी भरावयाचे शुल्क याबाबतचा तपशिल घेऊन, शुल्काचा संस्थानिहाय भरणा शासनामार्फत करण्यात येईल.

(४) सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेणारा उमेदवार पूर्व परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास त्याची शिष्यवृत्ती त्यावर्षीसाठी समाप्त करण्यात येईल. मात्र पुढील वर्षी तो पूर्व परीक्षा उत्तीर्ण झाल्यास मुख्य परीक्षेसाठीच्या शिष्यवृत्तीस पात्र राहील.

त्याचप्रमाणे उमदेवार मुख्य परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास त्याची त्यावर्षासाठीची शिष्यवृत्ती समाप्त करण्यात येईल. मात्र पुढील वर्षी तो मुख्य परीक्षा उत्तीर्ण झाल्यास मुलाखतीसाठीच्या शिष्यवृत्तीस पात्र राहील.

याबाबत त्या उमेदवाराने संचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई यांच्याकडे संपर्क साधून पुढील विहित प्रकिया पूर्ण करणे आवश्यक राहील.

(५) भाग-१ शिष्यवृत्तीस पात्र ठरणाऱ्या उमेदवाराने यापूर्वी भाग-१ शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नसावा.

**भाग-२ :-**

(१) त्या प्रचलित वर्षात भाग-१ मधील शिष्यवृत्तीचा लाभ न घेतलेल्या तथापि, केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या पूर्व परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना, त्याचप्रमाणे पुर्वी भाग-१ चा लाभ घेतलेल्या मात्र पूर्व परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यामुळे मुख्य परीक्षेच्या शिष्यवृत्तीस अपात्र ठरलेल्या व प्रचलित वर्षी पूर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना, त्या वर्षीच्या मुख्य परीक्षेपर्यंतच्या कालावधीसाठी दिल्ली येथील निवडक प्रशिक्षण वर्गांमध्ये मुख्य परीक्षेसाठी उपलब्ध असणाऱ्या कोर्सला प्रवेश घेण्यासाठी भाग-२ शिष्यवृत्ती देण्यात येईल.

(२) केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या पूर्व परीक्षेचा निकाल लागल्यानंतर सदर शिष्यवृत्तीचा अर्ज राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई यांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. उपरोक्त निकष पूर्ण करणाऱ्या व विहित मुदतीमध्ये जाहिरातीला प्रतिसाद देणाऱ्या उमेदवारांना विहित अटींच्या अधीन राहून सदर शिष्यवृत्ती देण्यात येईल.

(३) शासनाने निवड केलेल्या दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थांकडून प्रवेशित उमेदवार व त्यांच्या प्रशिक्षणापोटी भरावयाचे शुल्क याबाबतचा तपशिल घेऊन, शुल्काचा संस्थानिहाय भरणा शासनामार्फत करण्यात येईल.

(४) भाग-२ शिष्यवृत्तीस पात्र ठरणाऱ्या उमेदवाराने यापूर्वी भाग-२ शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नसावा.

**भाग-३ :-**

(१) केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या मुख्य परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांना त्या वर्षीच्या दिल्ली येथील निवडक प्रशिक्षण वर्गांमध्ये मुलाखतीसाठी उपलब्ध असणाऱ्या कोर्सला प्रवेश घेण्यासाठी भाग-३ शिष्यवृत्ती देण्यात येईल.

(२) मुख्य परीक्षा झाल्यानंतर सदर शिष्यवृत्तीचा अर्ज राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई यांच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. उपरोक्त निकष पूर्ण करणाऱ्या व विहित मुदतीमध्ये जाहिरातीला प्रतिसाद देणाऱ्या उमेदवारांना विहित अटींच्या अधीन राहून सदर शिष्यवृत्ती देण्यात येईल.

(३) शासनाने निवड केलेल्या दिल्ली येथील प्रशिक्षण संस्थांकडून प्रवेशित उमेदवार व त्यांच्या प्रशिक्षणापोटी भरावयाचे शुल्क याबाबतचा तपशिल घेऊन, शुल्काचा संस्थानिहाय भरणा शासनामार्फत करण्यात येईल.

(४) भाग-३ शिष्यवृत्तीस पात्र ठरणाऱ्या उमेदवाराने यापूर्वी भाग-३ शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला नसावा.

२. **अटी :- (भाग १, २ व ३ करिता)**

(१) सदर शिष्यवृत्तीकरिता दिल्लीस्थित नामांकित खाजगी प्रशिक्षण संस्थांपैकी शासनाने निवड केलेल्या तीन संस्थांपैकी एका संस्थेमध्ये प्रवेश घेण्याची मुभा पात्र उमेदवाराला देण्यात येईल.

(२) शिष्यवृत्तीसाठी पात्र उमेदवारास प्रशिक्षण घेतल्यानंतर केंद्रीय लोकसेवा आयोगाची संबंधित परीक्षा देणे बंधनकारक असेल, अन्यथा त्या शिष्यवृत्तीची संपूर्ण रक्कम एकरकमी शासनास परत करण्यात येईल अशा आशयाचे बंधपत्र देणे आवश्यक राहील. भाग-१ शिष्यवृत्तीचा लाभ घेणाऱ्या तथापि, पूर्व परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवाराला ही अट लागू राहणार नाही.

(३) सदरहू उमेदवाराने संचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई यांच्याशी संपर्कात राहून मासिक अहवाल सादर करणे बंधनकारक राहील. तसे न केल्यास त्याच्यावर उचित कार्यवाही करण्यात येईल.

३. **निर्वाह भत्ता:-** सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेणाऱ्या प्रत्येक उमेदवाराला दिल्ली येथील त्याच्या प्रशिक्षणाच्या वास्तव्याच्या कालावधीसाठी रु.१०,०००/- प्रति माह प्रमाणे निर्वाह भत्ता देण्यात येईल

४. सदर योजनेचे नियंत्रण व कार्यान्वयन करण्यासाठी खालीलप्रमाणे नियंत्रण समिती व कार्यकारी समिती राहील:-

**(१) नियंत्रण समिती :-** संपूर्ण योजनेचा आढावा घेण्याकरिता पुढीलप्रमाणे नियंत्रण समिती गठीत करण्यात येत आहे. या योजनेमध्ये अंमलबजावणीत काही अडचणी आल्यास उचित बदल करुन त्यास मान्यता देण्याचे अधिकार या समितीस राहतील:-

| अ.क्र. | पदनाम | पदाधिकारी |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई |
| २ | सदस्य | प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई |
| ३ | सदस्य | प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई |
| ४ | सदस्य सचिव | संचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC), मुंबई. |

(२) **कार्यकारी समिती :-** संपुर्ण योजनेच्या कार्यान्वयनाकरिता खालीलप्रमाणे कार्यकारी समिती गठीत करण्यात येत आहे. सदर समिती दर तीन वर्षांनी दिल्लीतील ३ प्रशिक्षण संस्थांची निवड करुन शासनास शिफारस सादर करेल.

| अ.क्र. | पदनाम | पदाधिकारी |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे |
| २ | सदस्य | निवासी आयुक्त व सचिव, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली |
| ३ | सदस्य सचिव | संचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC), मुंबई. |

५. यासाठी होणारा खर्च "२२०२ सर्वसाधारण शिक्षण, ००३ प्रशिक्षण, (०२) (०३) शासकीय महाविद्यालयात भारतीय प्रशासनिक सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र उघडणे, २२०२ एच १०८" या योजनेतंर्गतच्या शिष्यवृत्ती/विद्यावेतने या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात येईल व त्याखालील मंजूर तरतुदीतून भागविण्यात येईल.

६. सदर आदेश नियोजन विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपाचारिक संदर्भ क्रमांक-९२२/१४७१, दिनांक २८.३.२०१६, तसेच, वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२२१/१६, दिनांक ७.४.२०१६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०४१६१४३२४०३८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rohini Bhalekar

Digitally signed by Rohini Bhalekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Dept, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=440c600559857f4234e969f892346c88247ac813 46a1b7229bf9917deb7bce48, cn=Rohini Bhalekar
Date: 2016.04.16 16:16:54 +05'30'

**( रोहिणी भालेकर )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२) सर्व सन्माननीय विधानसभा/विधानपरिषद सदस्य,
३) मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई,
४) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
६) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,

७) अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
८) प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०) अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
११) महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे
१२) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रतींसह).
१३) निवासी आयुक्त व सचिव, महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली
१४) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१५) सर्व विभागीय सह संचालक, उच्च शिक्षण,
१६) संचालक, राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई,
१७) संचालक, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नागपूर/कोल्हापूर/औरंगाबाद/अमरावती/नाशिक.
१८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१९) अधिदान व लेखा अधिकारी, बांद्रा, मुंबई,
२०) विधीमंडळ ग्रंथालय, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई (१० प्रतींसह),
२१) मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२२) मा. राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२३) मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,
२४) प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
२५) उप सचिव (म.शि.), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
२६) कार्यासन अधिकारी (मशि-३), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
२७) निवडनस्ती-मशि-२.

## बंधपत्र चा नमुना

**शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक: प्रीआय-५४१५/प्र.क्र.१९२/मशि-२**
**दिनांक १६.०४ २०१६ अन्वये सादर करावयाचे बंधपत्र**

मी, श्री./श्रीमती/कुमारी_____________________________________________राहणार

________________________________________________________________

वय _______याद्वारे असे लिहून देतो/देते की माझी केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची पूर्वतयारी करून घेणाऱ्या दिल्ली येथील या _______________ खाजगी प्रशिक्षण संस्थामध्ये प्रशिक्षण घेण्यासाठी गुणवत्ताधारीत विशेष शिष्यवृत्ती योजनेसाठी निवड झालेली असून प्रशिक्षण घेतल्यानंतर मला केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा परीक्षा _________ देणे बंधनकारक असेल, अन्यथा मला देण्यात आलेली शिष्यवृत्तीची संपूर्ण रक्कम एकरक्कमी शासनास परत करेन याबाबत सदरचे बंध पत्र देत आहे.

ठिकाण :

दिनांक :

(सही )

(नाव)

(टीप:- सदर बंधपत्र रु.१०० चे स्टॅम्प पेपर नोटरी करून प्रवेश घेतल्यानंतर ३० दिवसाच्या आत **राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई** येथे सादर करणे बंधनकारक असेल.)